*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

S. Y. B. A. Special 1

# INDIAN PHILOSOPHICAL APPROACHES

## तत्त्वज्ञान ( स्पेशल 1 )

# भारतीय तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन

1

युनिट 1 : उपनिषदातील तत्त्वज्ञान (Upnishadic Philosophy)

1.1 : ब्राह्मणांमधील कर्मकांडास विरोध,उपनिषदातील विविधता आणि एकता.

1.2 : मुख्य सिध्दान्त :

ब्रह्म, आत्मा, परा आणि अपराविद्‌या (मुंडकोपनिषद आणि इशोपनिषद) ,

नैतिक विचार (इशोपनिषद)

1.3: संवादांचा परिचय : प्रजापती - विरोचन - इंद्र, उद्‌दालक - श्वेतकेतु (छांदोग्योपनिषद )

1.4 : याज्ञववल्क्य - मैत्रेयी ( बृहदारण्यकोपनिषद )

---

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

## उपनिषदातील तत्त्वज्ञान

प्रस्तावना :

भारतीय तत्त्वज्ञान समजावून घेण्यासाठी भारतीयांनी केलेले विचार समजावून घेणे गरजेचे आहे.विचार करणे हे माणसाचे लक्षण असल्यामुळेच ॲरिस्टॉटलने 'माणूस हा विचार करणारा प्राणी आहे' अशी व्याख्या केली. विचार करणे, ही मानसिक व वैचारिक कृती असून ती कृती करतो तो विचारवंत असतो. विचार करणे याचा अर्थ विश्लेषण करणे, चुका शोधून त्या टाळणे,योग्य आणि सत्य निष्कर्षाकडे जाणे.याचा अर्थ विचारांमधील चुका शोधून ते विचार कमाल पातळीवर निर्दोष बनविणे असते. तत्त्वज्ञान म्हणजे विचारांचा विचार, असे ॲटनी फ्ल्यू या तत्त्वज्ञाचे मत आहे.या अर्थाने भारतीय तत्त्वज्ञान हा भारतीयांनी केलेल्या विचारांचा विचार आहे.

भारतीय तत्त्वज्ञानास प्राचीन परंपरा असून किमान तीन हजार वर्षांचा इतिहास आहे. हे तत्त्वज्ञान प्राचीन धार्मिक विचारांमधून विकसित झाले आहे. प्राचीन भारतात तीन धर्म विकसित झाले. हिंदु,बौध्द आणि जैन. 'वेद ' नामक वाङमय हे भारतीय तत्त्वज्ञानाचा मूलाधार समजले जाते. *'वेद'* या नावाचे कोणतेही एकच एक पुस्तक नाही, तर अनेक ग्रंथांचा तो मोठा संग्रह आहे.त्या सगळ्यांना मिळून वेदवाङमय किंवा वैदिक साहित्य म्हंटले जाते.वेदांची भाषा संस्कृत आहे.वेदांमधील तत्त्वज्ञान 'उपनिषदे' नामक ग्रंथसंग्रहात व्यक्त झाले आहे.

## वेद

'वेद' हा शब्द संस्कृत 'विद्' पासून बनतो.*विद् म्हणजे जाणणे, ज्ञान होणे* असा आहे. वैदिक साहित्य अक्षरश: अपार असून त्यापैकी काही अंशच आज आपणास उपलब्ध आहे.स्थल व कालदृष्ट्या या साहित्याची व्यापकता फार मोठी आहे. हे साहित्य मंत्र स्वरूपात आहेत.त्यांचे एकत्रीकरण केले असून त्यांना 'संहिता'

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

म्हणतात.संहिता म्हणजे संग्रह.या संहितांमधील विचारांचे पुन्हा स्वतंत्र चिंतन झाले असून त्यांना 'ब्राह्मणे' असे नाव आहे. या मंत्र व ब्राह्मण यांना वेद असे म्हंटले जाते.मंत्र म्हणजे संहिता आणि ब्राह्मणे म्हणजे ब्राह्मणग्रंथ,आरण्यके आणि उपनिषद होय.

## वेदांची रचना

प्राचीन आर्यांनी उत्तर ध्रुव या मूळ निवासस्थानापासून भारतात येवून वसती करण्याचा काल व प्रवास केलेली ठिकाणे विविध आहेत.या कालात व वेगवेगळ्या ठिकाणी ही निर्मिती होत राहिली.हा भूभाग विशाल व प्रदीर्घ होता.वेदांइतके प्राचीन व सलग साहित्य जगात इतरत्र कोठेही नसल्याने केवळ भारतीयांच्या नव्हे तर मानवी इतिहासातच वेदांना मूलभूत महत्व आहे.मानवनिर्मित कल्पना आणि विचारधारांचा इतिहास समजावून घेण्यासाठी वैदिक साहित्यासारखे दुसरे साधन उपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता ग्रीक तत्त्वज्ञानापेक्षाही वैदिक तत्त्वज्ञान प्राचीन असल्याचे लक्षात येते. त्यामुळे तत्त्वज्ञानाची अस्सल गंगोत्री वैदिक सहित्यातूनच उगम पावते,हे अधोरेखित होते.

वेदवाङमय अक्षरश: अफाट आहे. वैदिक परंपरेनुसार वेदांचे मंत्र व ब्राह्मण असे विभागीकरण करण्यात आले आहे.या विभागांचे स्वरूप आणि त्यामधील चिंतन विषय पुढीलप्रमाणे :

1) संहिता : ऋषींमुनींनी देवदेवतांना उद्देशून रचलेल्या मंत्रांचा संग्रह : ऋग्वेद, यजुर्वेद , सामवेद, व अथर्ववेद.[1]
2) ब्राह्मणे : प्रार्थना व यज्ञविधी, कर्मकांड, देवांच्या कथा, आख्याने, मंत्रांचा अर्थ इत्यादी.
3) आरण्यके : अरण्यातील ऋषिमुनींचे जीव, ईश्वर, व विश्वविषयक विचार.वानप्रस्थाश्रम कालात गृहस्थाने अरण्यात राहून केलेले चिंतन, मनन.
4) उपनिषदे : तत्त्वज्ञान.वेदांच्या शेवटी येणारा हा भाग असल्याने उपनिषदानांच 'वेदान्त ' म्हणतात.

या विशाल व अफाट वाङमयात संहिता हा प्रकार प्रथम रचला गेला.त्यातील ऋग्वेद ही संहिता मानवी इतिहासातील पहिली रचना आहे.ती साधारणत: इ.स.पू.1200 या कालात रचली गेली असावी, असे मॅक्सम्यल्लर[2] या पंडिताचे मत आहे. वेद स्वीकारणाऱ्यांना *वैदिक* आणि वेद नाकारणाऱ्यांना *अवैदिक* म्हणतात.बौध्द व जैन धर्मांनी वेद नाकारल्याने ते अवैदिक मानले जातात.आणि हिंदुंनी स्वीकारल्याने त्यांना वैदिक मानले गेले.भारतीय तत्त्वज्ञान या तीन धर्मांमधील तात्त्विक विचारांमधून विकसित झाले आहे. या तात्त्विक विचारास 'दर्शन' अशी संज्ञा आहे.सहा वैदिक आणि तीन अवैदिक दर्शने मिळून भारतीय तत्त्वज्ञान बनते.

[1] **ऋग्वेदः** म्हणजे ऋचांचे ज्ञान. या ऋचांमध्ये विविध देवतांच्या प्रार्थना,कथा,संवाद यांचे वर्णन पद्य मंत्रात आहेत.
**यजुर्वेदः** यज्ञविधीची माहिती.गद्य मंत्र व प्रार्थना दोन प्रकार : कृष्ण यजुर्वेद संहिता आणि शुक्ल यजुर्वेद संहिता
**सामवेदः** साम म्हणजे विशिष्ट सुरात केलेले गायन.यज्ञ करताना ऋचांचे गायन केले जाई.हा भारतीय संगीतशास्त्राचा पाया आहे.
**अथर्ववेदः** भौतिक समृध्दिसाठीचे गद्य व पद्य मंत्र.बुध्दी, शौर्य ,आरोग्य, रोगनिवारण, नामकरण, वशीकरण, विवाह. जादूटोणा, काळी जादू इत्यादीचा उगम यात आहे.

[2] **फ्रेडरिक मॅक्स म्यूलर** (06डिसेंबर 1823 ते 28 ऑक्टोबर 1900) हे जर्मन भाषाशास्त्रज्ञ आणि पौर्वात्य विद्यांचे गाढे अभ्यासक होते.पाश्चात्य राष्ट्रांमधील भारतीय विद्याअभ्यास ज्ञान शाखेची स्थापना यांनी केली.ईस्ट इंडीय कंपनीने भारताचा धोरणात्मक अभ्यास केला.त्याचाच भाग म्हणून मॅक्स म्युलर यांनी कंपनीत नोकरी करून भारतीय विद्यांचा (इंडॉलॉजी) अभ्यास केला . 'सॅक्रीड बुक्स ऑफ ईस्ट ' हा 50 खंडाचा प्रकल्प यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिध्द झाला.तथापि मॅक्स म्युलर भारतात कधीही येवू शकले नाहीत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

**Friedrich Max Müller**
(December 6, 1823 – October 28, 1900), a German philologist and Orientalists
Müller wrote the *Sacred Books of the East*, a massive, 50-volume set of English translations prepared under his direction, stands as an enduring monument to Victorian Scholarship





## श्रुति वाङ्मय

वेद, ब्राह्मणे व उपनिषदे यांना 'श्रुति' म्हंटले जाते.ज्याचे श्रवण केले व त्याद्वारे स्मरणात ठेवली जाते ती श्रुति होय.श्रुतिचा विस्तारित अर्थ म्हणजे 'ईश्वरप्रणीत' होय.वैदिकांच्या म्हणण्यानुसार वेद हे अपौरूषेय आहेत. म्हणजे कुठल्याही पुरुषाने (पर्यायाने कोणत्याही मानवाने) निर्माण केलेले नाहीत; तर ईश्वरापासून आलेले आहेत.गुरुदेव रा.द.रानडे यांच्या मते 'आत्मानुभवाच्या उन्मादाने प्राप्त होणारी अंत:स्फूर्ति अथवा ईश्वरी प्रेरणा म्हणजे श्रुति' होय.याचा अर्थ ईश्वर प्रेरणा लाभलेल्या ऋषीमुनींनी ते रचले आहेत, असा घेतला जातो.

उपनिषदांच्या म्हणण्यानुसार चारही वेदसंहिता ही ईश्वराची नि:श्वसिते (घोरणे) आहेत.एवढेच नव्हे तर इतिहास, पुराणे, शास्त्रे,काव्ये व या सर्वांवरील भाष्ये ही सारीच ईश्वराची नि:श्वसिते आहेत.म्हणजे ईश्वर प्रेरणा लाभलेल्या कर्त्या ऋषीमुनींनी ते रचले आहेत.

## उपनिषदे

### उपनिषद् शब्दाचा अर्थ

उप + नि + सद् या धातूपासून उपनिषद् शब्द तयार झालेला आहे. म्हणजे सद् या धातूला उप आणि नि हे उपसर्ग लावून हा शब्द बनतो.खरे तर त्याचा अर्थ 'जवळ जावून बसणे' इतकाच होतो; तथापि नंतर 'शिष्याने गुरुजवळ अध्ययनासाठी वा उपदेश मिळविण्यासाठी जावून बसणे' असा अर्थ झाला.त्यापासून 'गुरुजवळ जाऊन बसल्यावर मिळणारी विद्या, तत्वज्ञान, विचार' असा अर्थ बनला.हा विचार 'रहस्यात्मक' असल्यामुळे 'उपनिषद्' याचा अर्थ 'रहस्य, गूढ विचार' असा झाला.कालांतराने उपनिषद हा शब्द रहस्यात्मक विचार एकत्र ग्रथित करण्यांत आलेल्या ग्रंथांना उद्देशून वापरला गेला.

मॅक्सम्यूलरच्या मते 'उपनिषद' शब्दाचा अर्थ हळूहळू बदलत गेला. हे संक्रमण "विद्यार्थ्यांचा वर्ग → नि:सीम श्रध्दा→ सत्य → दैवी विचाराचा आविष्कार" या रीतीने झालेले आहे.ओल्डेनबर्ग[3] यांना हा शब्द 'उपासना' या शब्दाशीं निगडित असावा असें वाटतें.डयूसेन[4]च्या मते "रहस्यात्मक शब्द →

[3]मॅक्सम्यूलर प्रमाणेच दुसरे संस्कृत व पाली भाषा अभ्यासक व भाषाशास्त्रज्ञ म्हणजे प्रोफेसर हर्मन ओल्डेनबर्ग (31 ऑक्टोबर 1854ते 18 मार्च 1920) .बुध्द धर्म आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास त्यांनी मूळ पाली ग्रंथांवरून केला. 1881 मध्ये त्यांची बौध्दधर्मावरील महत्वाची पुस्तके प्रकाशित झाली.ते जर्मनीत विद्यापीठांमध्ये प्रोफेसर होते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

रहस्यात्मक ग्रंथ → रहस्यात्मक विचार '' असें अर्थसंक्रमण झालेलें असावे. खुद्द ब्राह्मण ग्रंथांतच 'उपनिषद्' हा शब्द 'रहस्यात्मक अर्थ, सारभूत अर्थ' या अर्थी योजण्यांत आला आहे. (शतपथ ब्राह्मण 3.5.12, 4.5.1, 5.1.1).बृहदारण्यक उपनिषदांत *'इतिहास: पुराणंविद्या उपनिषद: श्लोका: '* (2.4.10) असे म्हंटले असून येथे उपनिषद् हा शब्द 'ग्रंथ' या अर्थाने वापरला आहे. शंकराचार्यांनी मुण्डक उपनिषदावरील आपल्या भाष्यांत 'अविद्येचा नाश करणारें ज्ञान, ब्रह्मज्ञान करुन देणारें ज्ञान, तारक ज्ञान' असा या शब्दाचा अर्थ केला आहे.या सर्व विवेचनावरुन *'अंतिम सत्याचें ज्ञान करुन देणारी रहस्यात्मक विद्या व ती देणारे ग्रंथ* 'इतका अर्थ उपनिषद् या शब्दापासून घेण्यास हरकत नाही. 4

जुन्या भारतीय भाष्यकारांनी 'उपनिषद्' या शब्दाचा वेगवेगळया प्रकारें अर्थ लावला आहे.परंतु, त्यांनीं केलेलीं अर्थविवरणे ऐतिहासिकदृष्टया किंवा भाषाशास्त्रदृष्टया निर्दोष म्हणता येत नाहीत. कारण, त्या भाष्यकारांनी त्यांच्या काळीं जो अर्थ प्राप्त झाला, तोच या शब्दाला चिकटविला. शिवाय एकच भाष्यकार त्या शब्दाच्या व्युत्पत्तीचे अनेक पर्याय देतो. म्हणजेच भाष्यकार निश्चित अर्थ सांगत नसून, त्याला केवळ संभवनीय वाटणारे अर्थ देत आहे.

सामान्यत: 'उपनिषद्' शब्द हा 'रहस्य' किंवा 'गुप्त' या अर्थानें वापरलेला आहे.हाच मूळ अर्थ असावा. व्युत्पत्तिदृष्टया, उपनिषद् म्हणजे नि = एकाग्र चित्तानें किंवा भक्तिपूर्वक, उप=जवळ, सद्=बसणे. कालांतरानें त्याचा अर्थ *'अशा खासगी बैठकीमध्यें केलेला गुप्त उपदेश'* असा केला गेला. अनेक उपनिषदांवरुन हें स्पष्ट दिसतें कीं, या 'उपनिषद्' ग्रंथांतील उपदेश गूढ स्वरुपाचा मानलेला होता, आणि अनधिकारी व्यक्तींकडून त्याचा विपरीत अर्थ लावला जाईल किंवा त्याचा दुरुपयोग होईल म्हणून त्यांच्यापर्यन्त तो जाऊं नये याबाबत विशेष दक्षता घेतली गेली होती.उदाहरणार्थ, प्रश्नोपनिषदांत अशी कथा आहे कीं, एका थोर ऋषींकडे अंतिम सत्यज्ञानासाठी सहा शिष्य गेले. परंतु अध्यापनास प्रारंभ करण्यापूर्वी, त्या ऋषींनी सर्व शिष्यांना एक वर्षभर आपल्या समवेत राहण्यास सांगितले. कठोपनिषदांतहि, मृत्यूनंतर आत्मा अस्तित्वांत असतो किंवा नाहीं या प्रश्नांविषयी नचिकेतस् जेव्हां जिज्ञासा व्यक्त करतो, तेंव्हां आपल्या तरुण पृच्छकाच्या बुध्दीची शुध्दता आणि सामर्थ्य यांची कसोटी घेतल्यानंतरच यम त्याच्या प्रश्नांचे उत्तर देतो. यात शिष्यांची पात्रता पारखून पाहण्याचा उद्देश होता,हे उघड आहे. पात्रापात्रतेचा विचार न करतां सर्वांना अंतिम सत्याचें ज्ञान देण्यास गुरु तयार नसणे, ही गोष्ट केवळ भारतांतच होती असें नाहीं; तर ती सर्वच प्राचीन मानवांमध्यें होती.उदाहरणार्थ प्राचीन ग्रीस तत्त्वज्ञ हेरॅक्लायटस म्हणतो की *''ज्यांना सुवर्ण हवें असेल त्यांनीं त्यासाठीं खणण्याचें श्रम केले पाहिजेत, नाहींपेक्षां त्यांनीं तृणावरच समाधान मानलें पाहिजे''.*

प्राचीन उपनिषदांनंतरही बराच काळ 'उपनिषद' या शब्दाचा वापर करून काही ग्रंथांची निर्मिती झाली.मुस्लीम काळात इस्लामचा प्रभाव पडून अल्लोपनिषद रचले गेले.नंतर रसोपनिषद,गर्भोपनिषद असे ग्रंथ तयार होत गेले.

उपनिषदांमध्ये कांहीं ठिकाणी लहान, परंतु सारनिवेदन करणारी, सूत्रांच्या स्वरुपाचीं वाक्ये वारंवार आढळतात.उदहारणार्थ 'तत्वमसि।' 'तू ते आहेस'', 'अहम् ब्रह्मास्मि'. या वचनांना महावाक्ये म्हणतात.त्या


[4] 28 ऑक्टोबर 1900तिसरे जर्मनीचे संस्कृत अभ्यासक आणि पंडीत म्हणजे पॉल जेकब ड्यूसेन (07 जानेवारी 1845 ते 06 जुलै 1919).ऑर्थर शॉपनेहॉवर या तत्त्ववेत्त्याचा त्याच्यावर खूप मोठा प्रभाव होता.ते फ्रेडरिक नीत्शे आणि स्वामी विवेकानंद यांचे मित्र होते.ड्यूसेन यांच्यामुळे ब्रिटीश भारत, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनीत भारतीय संस्कृतीविषयी गंभीर चिंतन सुरु झाले.हिंदुधर्माच्या प्रेमापोटी त्यांनी स्वतःचे नाव ' देवसेन ' असे केले होते.

Department of Philosophy, Sangamner college, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

वाक्यांच्या शिक्षणाने अंतिम सत्याप्रत जात येते.संक्षेप केलेले हे तत्त्वविचार आहेत.त्यामुळे या महावाक्यांना सुध्दा 'उपनिषद्' हे नाव दिलेलें आहे.

**Hermann Oldenberg**
(October 31, 1854 - March 18, 1920)
a German scholar of Indology,
and Professor at Kiel (1898)
and Göttingen(1908)





## उपनिषदांचा काळ व उपनिषदांचे वर्गीकरण : प्रधान व अप्रधान

वैदिक साहित्यांत अनुक्रमे वैदिक संहिता, ब्राह्मणे व आरण्यके यांच्यानंतर उपनिषदें येतात. म्हणजे ती त्या त्या कालात त्या क्रमाने निर्माण होत गेली.उपनिषदांचा काळ सामान्यत: इ.स.पू. 1200 ते इ.स.पू. 600 आहे, असे आधुनिक संशोधनावरून निश्चित केले आहे.वैदिक सूक्ते रचून झाल्यानंतर आणि बौध्दधर्माच्या (इ.स.पू. 600) उदयाच्या दरम्यान उपनिषदे रचली गेली असावीत. अर्थात कालक्रम ठरविणे कठिण, म्हणून वादग्रस्त आहे.तथापि काही आधी रचली गेली तर काही नंतर रचली गेली.

या उपनिषदांची संख्या बरीच मोठी, जवळ-जवळ दोनशेच्या आसपास अशी मानली जाते. सर्वसामान्यपणें त्यापैकी 108 उपनिषदे प्रमाणभूत मानलीं जातात.त्यांतहि बारा-तेरा उनिषदांनांच खरेखुरे महत्व आहे. साधारणपणे बौध्दधर्माच्या आधीच्या उपनिषदांना प्राचीन आणि नंतरच्या उपनिषदांना अर्वाचीन म्हणण्याची पध्दत आहे.त्यानांच अनुक्रमे प्रधान व अप्रधान अशी नावे आहेत.

### प्रधान उपनिषदे

(1) ईश
(2) केन
(3)कठ
(4) प्रश्न
(5) मुण्डक
(6) माण्डूक्य
(7) तैत्तिरिय
(8) ऐतरेय
(9) छान्दोग्य
(10) बृहदारण्यक
(11) श्वेताश्वतर
(12) मैत्रायणी
(13) कौषितकी

ही उपनिषदे महत्वाची मानली जातात. तत्वज्ञानाच्या दृष्टीने हीच उपनिषदे प्रातिनिधिक व आधारभूत आहेत. त्यामुळे या उपनिषदाना *'प्रधान उपनिषदे'* म्हंटले जाते.इतर उपनिषदांना *'अप्रधान उपनिषदे'* म्हणतात. 'प्रधान' उपनिषदांत आलेला विचारच 'अप्रधान' उपनिषदांत विकसित झालेला आहे. ही 'प्रधान' उपनिषदे वैदिक वाङमयाशी म्हणजे संहिता व ब्राह्मणग्रंथांशी निगडित आहेत, तर अप्रधान उपनिषदे ही पुराण व तंत्र यांच्याशी अधिक निगडित आहेत. उपनिषदांची हीच वर्गवारी भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने महत्वाची आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

## वर्गीकरणाचे निकष

अभ्यासकांनी प्राचीन उपनिषदें व अर्वाचीन उपनिषदें यातील फरक निश्चित करण्यासाठी काही निकष मानले आहेत.ते असे :

(1) भाषाशैली, लेखनशैली,शब्द-संपत्ती, व्याकरणाची वैशिष्ट्ये
(2) उपनिषदांतील कल्पना,तात्विक विचार आणि त्यांचे विकसित स्वरुप,त्यांचे इतर तपशिल इ.
(3) ए.बी.कीथ [5] यांच्या मते पुनर्जन्म व संसारभ्रमण या कल्पनांचे अस्तित्व व विकास हा निकष.
(4) उपनिषदांत उल्लेखिलेलीं 'अवतरणे', विशेषत: परस्परसंबंधावर प्रकाश टाकणारीं अवतरणे
(5) ड्यूसेन [6] च्या मते , गद्य व पद्य ही उपनिषदांची लेखनशैली

अर्थात यांतील कोणतीही एक कसोटी निर्णायक अशा स्वरुपाची नाही व त्यामुळेच या सर्व कसोटया वापरुनहि काढलेले निष्कर्ष हे बिनचूक व सर्वथा विश्‍वसनीय असतात असें म्हणतां येत नाही.

सुप्रसिध्द तत्ववेत्ते व उपनिषदांचे गाढे अभ्यासक डॉ. गुरुदेव रा.द.रानडे[7] यांच्या मताप्रमाणे वरील तेरा उपनिषदांचे कालक्रमदृष्टया पांच वर्ग करता येतात :

(1) बृहदारण्यक व छान्दोग्य उपनिषदे
(2) ईश व केन उपनिषदे.
(3) वर्गांत ऐतरेय, तैत्तिरीय व कौषीतकी उपनिषदे.
(4) कठ, मुण्डक, श्‍वेताश्‍वतर उपनिषदे.
(5) प्रश्‍न, मैत्रायणी व माण्डूक्य उपनिषदे -

## 1.1: उपनिषदातील विविधता आणि एकता

उपनिषदे रचण्याची प्रक्रिया अनेक शतके होत होती.प्राचीन भारतीय उपखंडाच्या विविध भागात राहणाऱ्या ऋषीमुनींनी आपआपल्या कालखंडात ती रचली.एकाच वेळी एकाच व्यक्तिने अथवा काही व्यक्तिंनी अथवा परस्पर सहकार्याने ती रचली,असे घडलेले नाही.या विचारांचे निर्माते वेगवेगळ्या कालातील, विविध भूभागातील,भिन्न मतांचे, संस्कारांचे, वृत्तीचे, स्वभावाचे,दृष्टिकोनांचे आणि विविध वैचारिक क्षमता असणारे होते. उपनिषदांची रचना अनेक शतके होत राहिल्याने उपनिषदांमध्ये अनेक शतकांचा, तत्वचिंतकांच्या पिढयांचा, त्याचप्रमाणे अनेक तत्वचिंतकांचा विचार आलेला आहे. त्यामुळे उपनिषदांमध्ये फार मोठी विविधता, भिन्नता आढळते.

---

[5] **Arthur Berriedale Keith** (1879–1944) a Scottish constitutional lawyer, scholar of Sanskrit and Indologist. He became Regius Professor of Sanskrit and Lecturer in Constitutional History in the University of Edinburgh.

[6] **Paul Jakob Deussen** (January 7, 1845 – July 6, 1919) a German Orientalist and Sanskritscholar. Influenced by Arthur Schopenhauer and a friend of Friedrich Nietzsche and Swami Vivekananda. Deussen, who 'Sanskritised' his name to 'Deva-Sena' as a mark of his admiration for Hinduism.

[7] *उपनिषद रहस्य* - गुरुदेव रा. द. रानडे , भाषांतर : प्रा. कृ.वे.गजेन्द्रगडकर,पान 13-14, 36अनाथ विद्यार्थि गृह, पुणे 1932

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



सर्व उपनिषदांनी मिळून एकच-एक विचार वा तत्वप्रणाली किंवा सुव्यवस्थित सिध्दान्त पध्दतशीर रीतीने मांडला आहे असे दिसत नाही.या उपनिषदांमध्ये एक विशिष्ट 'दर्शन' मांडले आहे, असेही नाही. उलट त्यात अनेक विषयावंर अनेक आणि विविध मते आढळतात. एवढेच नव्हे तर परस्पर विरुध्द विचार मांडल्याचेही आढळते.

उपनिषदांचे एक मूलभूत वैशिष्ट्य असे की उपनिषदांमध्ये पुढे निर्माण झालेल्या अनेक दर्शनांना मूलभूत ठरलेलें व उपयुक्त झालेले असे विचारधन भरपूर आहे; परंतु उपनिषदांना *'स्वत:चे स्वतंत्र दर्शन'* नाही. तथापि विचारकर्त्या ऋषीमुनीनी उत्स्फूर्त विचार मांडलेले असल्यामुळे त्यांच्यांतील विवेचनामध्ये एक प्रकारची अर्थगर्भता आली आहे.त्यात अनेकदा संदिग्धता आढळते.पण ती इतकी समृध्द आहे की त्या संदिग्धतेमुळेच नंतरच्या कालातील आदि शंकराचार्य, राजानुजाचार्य किंवा वल्लभाचार्य आणि द्वैतवादी मध्वाचार्य हे सारे आचार्य त्यांना अपेक्षित इष्ट तसा अर्थ काढू शकले.

उपनिषदांमध्ये आलेले विचार पध्दतशीर रीतीने, खंडन-मंडन पध्दतीने आणि एकात्मतेवर व सुसंगततेवर लक्ष ठेवून आलेले नाहीत आणि त्यांच्यात प्रचंड विविधता असली तरी ही काही बाबतीत मात्र उपनिषदांमध्ये समान वैचारिक सूत्र शोधता येते.उपनिषदांचे स्वत:चे स्वतंत्र तत्वज्ञान आहे, असें आपण म्हणूं शकतों.त्यातील सा-या एकविचारांत विकास व प्रगती दिसते.एक मुख्य भूमिका आढळते. उपनिषदांचे स्वत:चे काही मूलभूत सिध्दान्त सापडतात. या मूलभूत सिध्दान्तांचे महत्व भारतीय तत्वज्ञानाच्या इतिहासाच्या दृष्टीने फार मोठें आहे. भारतीय दर्शनाचा किंवा तत्वज्ञानाचा येथे पायाच घातला गेला. एवढेंच नाही तर, पुढील अगदी विकसित काळातही भारतीय विचार उपनिषदांमधील विचारांच्यापलीकडे फारसा जावू शकला नाही.

उपनिषदांमधील जीवनदृष्टि, मानवाचें यथार्थ स्वरुप, अंतिम सत्यासंबंधीची कल्पना यांसंबंधीचे विचार इतके उच्च दर्जाचे आहेत की, त्यामुळे जागतिक तत्वज्ञानात्मक वाङमयात व विचारांत उपनिषदांतील विचारांना एक अनन्यसाधारण असें महत्वाचें स्थान आहे.अगदी आधुनिक युगातहि शास्त्र, तत्वज्ञान व धर्म या तिघांनाहि मान्य होऊन त्यांनाहि पुनीत करुं शकेल इतकी वैचारिक यथार्थता व आध्यात्मिक संपन्नता या उपनिषदांमध्ये आहे आणि हें त्यांचें विलोभनीय वैशिष्ट्य आहे.

## उपनिषदांची विवेचन पध्दती

उपनिषदांचे ग्रंथ मुख्यत: संवादरुपाने लिहिलेले आहेत.त्यांच्या शैलीमध्ये काव्यात्मताच अधिक आहे. त्यामुळे त्यांना तत्वज्ञानात्मक काव्ये_असें म्हटलें गेलें आहे.त्यामध्ये दृष्टान्त आणि रुपक महत्वाचे आहे.त्यांची भाषा कांहीं ठिकाणी प्रतीकात्मक आहे पण भाषेच्या रमणीयतेला कोठेहि बाध आलेला नाहीं.उपनिषदात सूत्रमय शैली सुध्दा आहे.या शैलीवरुन असे दिसते की.मौखिक प्रतिपादनाच्या हेतूनेच त्यांची रचना केली गेली होती. प्रतिपादनांत जेथें कांहीं उणीव भासेल तेथें व्याख्यात्याला सहज भरुन काढतां येत असे.या वैशिष्टयामुळें एक अडचण येते. ती अशी की उपनिषदांमधील अनेक उता-यांचा अर्थ लावणें सुलभ होत नाही.त्यामुळेच पूर्वी जसे या उता-याचे भिन्न भिन्न अर्थ लावले जात तसे आजहि लावले जातात.

तथापि, ही संदिग्धता केवळ तपशीलाच्या बाबतीत आहे, त्यांचा सामान्य भावार्थ अगदी नि:संदिग्ध आहे. वेद-वाङमयापैकी उपनिषदांनीं परदेशीयांचे लक्ष प्रथम वेधून घेतलें. मोगलांच्या काळांत यांपैकी कित्येक उपनिषदांचीं पर्शियन भाषेत भाषान्तरें झाली.गेल्या शतकाच्या प्रारंभी पर्शियनमधून लॅटिन भाषेत रुपान्तरे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

झाली.यूरपमधील विद्वानांना या लॅटिन रुपांतरांच्या द्वारांच उपनिषदांचा प्रथम परिचय झाला, आणि याच रुपांतरांवरुन शॉपेनहॉअर[8] सारखा विचारवंत त्यांची प्रशंसा करु लागला.


अलीकडे उपनिषदांची मूळ संस्कृतमधून पाश्चिमात्य भाषांमध्यें अगणित भाषान्तरें झालीं आहेत. उपनिषदांतील प्रतिपाद्य विषयानेहिं परदेशीय विद्वानांचें लक्ष वेधलें आहे.

साधारणपणे उपनिषदांच्या विवेचनपध्दतीचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील[9] :

1. *उपमापध्दती :* वर्णन करताना उपमा देणे - विश्व हे मोठे चक्र आहे, त्रिगुण ह्या धावा आहेत. .. इ.इ.
2. *सूत्रपध्दती :* मोठे गहन विचार सूत्रमय भाषेत सांगणे - अहं ब्रह्मास्मि .. ..
3. *व्युत्पत्ती पध्दती :* शब्दाचे मूळ सांगणे - पुरुष = पुरिशय म्हणजे हृदयाच्या किल्ल्यात राहणारा .
4. *दंतकथात्म पध्दती :* रूपक/ कथा सांगणे
5. *सादृश्य पध्दती :* सादृश्य दाखविणे - पाण्यात मीठ विरघळते तसे आत्मा परमात्म्यात सामावला जातो.
6. *संवाद पध्दती :* गुरु - शिष्य या दोघांमधील संवाद - यम व नचिकेतस् , याज्ञवल्क्य - मैत्रेयी ..
7. *समन्वय पध्दती :* कोणताही विचार त्याज्य न मानता त्यातील सार घेणे - नीरक्षीर विवेकबुध्दी
8. *आत्मसंवाद पध्दती :* स्वत:शीच बोलत राहणे.
9. *समयसूचक पध्दती :* प्रसंगानुरुप उत्तर देणे
10. *प्रतिगामिक पध्दती :* प्रश्नाचे उत्तर देताना मागील प्रश्नाशी जोडणे.

वेदांमधील कर्मकांड आणि यज्ञविधींच्या विरोधातून उपनिषदांची निर्मिती व विकास झाला.व्यापक अर्थाने ब्राह्मणग्रंथांच्या विरुध्द उपनिषदांनी बंडखोरीच केली होती. ब्राह्मणग्रंथांमध्ये कर्मकांड व यज्ञविधीची माहिती असल्याने आपण प्रथम या ब्राह्मणग्रंथांचे व कर्मकांडाचे स्वरूप पाहू.

**Arthur Schopenhauer**
(22 February 1788 – 21 September 1860)
a German philosopher known for
his pessimism and philosophical clarity.
At age 25,
he published his doctoral dissertation



8 ऑर्थर शॉपनेहॉवर 1788 - 1860 जर्मन तत्त्ववेत्ता

9 *उपनिषद रहस्य* - गुरुदेव रा. द. रानडे , भाषांतर : प्रा. कृ.वे.गजेन्द्रगडकर,पान 30 36 अनाथ विद्यार्थि गृह, पुणे 1932

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## 1.1 ब्राह्मणग्रंथांचे व कर्मकांडाचे स्वरूप :

'ब्राह्मण' हा शब्द 'ब्रह्मन्' पासून बनतो.त्याचा अर्थ ब्रह्मविषयक ज्ञान.वैदिक साहित्यात 'ब्रह्म म्हणजे वेदाचे किंवा ब्रह्माचे ज्ञान.ते ज्ञान ज्या ग्रंथांमध्ये आहे त्यांना **ब्राह्मणग्रंथ** असे नाव आहे.या अनुषंगाने हळूहळू 'ब्राह्मण' शब्दाचा अर्थ यज्ञ व यज्ञविषयक कर्मकांड करणारा याज्ञिक पुरुष असा बनला.(हे काम करणारे सारे ब्राह्मण बनले.)

ब्राह्मणग्रंथांचा रचनाकाल निश्चित करता येत नाही.तथापि अंदाजे इ.स.पू.1200 वर्षापूर्वी ती रचली गेली असावीत.आधी वेदांची सूक्ते व मंत्र, नंतर त्यांच्या संहिता, नंतर त्यांची ब्राह्मणे व त्यानंतर आरण्यके व ब्राह्मणे रचली गेली असावीत.प्रत्येक संहितेला (ऋग्वेद,सामवेद इत्यादी)त्यांचे स्वतंत्र ब्राह्मणग्रंथ असतात. असे हजारो ब्राह्मणग्रंथ आहेत.पण सर्वच उपलब्ध नाहीत.

ब्राह्मणग्रंथाचे पुरस्कर्ते म्हणजे कर्मकांडे करणारे कट्टर ब्राह्मण[10] होय.त्यांचे तीन प्रमुख दावे आहेत:

1) *वेद हेच अंतिम सत्य व प्रमाण ग्रंथ आहेत.त्यांची सत्यता संशयातीत व निरुपाधिक (कशावरही अवलंबून नसलेली अशी स्वतंत्र ) आहे.*
2) *केवळ ब्राह्मण पुरोहितच वेदांचे अर्थ लावण्यास पात्र असतात.*
3) *वेदांचे ध्येय कर्मकांडे करणे हेच आहे.*

## यज्ञविधी व कर्मकांडे : ब्राह्मणग्रंथांचा विषय

ब्राह्मणग्रंथांमध्ये यज्ञविद्या व यज्ञासंबंधीचे विवेचन केलेले आहे.कोणता यज्ञ कसा, का,कुठे करावा, त्याचे यजमान कोण असावेत, कोणत्या यज्ञाने कोणते फळ मिळते यासंबंधीची माहिती यात आहे. हे ग्रंथ यज्ञ करणाऱ्या पुरोहित मंडळींनी पुरोहितांच्याच मार्गदर्शनासाठी ते लिहिलेले आहेत.

ब्राह्मणग्रंथात म्हणजे वेदांमध्ये यज्ञकर्माचा उपदेश आहे. ही कर्मे प्रारंभी अगदी सोपी होती. त्यांच्यामागील प्रेरक हेतूहि साधा होता. परिचित निसर्गशक्तिरुपी उपास्य देवतांना दूध, धान्य, तूप, यांसारख्या द्रव्यांची आहुति दिली जात असे.संतति, पशुधन इत्यादि प्राप्त व्हावे किंवा आपल्या मार्गातून शत्रू दूर व्हावेत, यांसारख्या सामान्य इच्छासाठी यज्ञ केला जात असे. काही प्रसंगी, देवतांनी पूर्वी केलेल्या अनुग्रहाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी याग केला जाई.त्यांत पावित्र्योत्पादक 'संस्कारा' ची कल्पनाही असावी.म्हणजे '' देवतांनी अविर्भाग ग्रहण केल्यामुळें आपण पवित्र शक्तींच्या आधीन झालो आहोत'' किंवा '' आपण खुद्द देवात्म झालो आहोत '' अशी श्रध्दा यज्ञ करणा-या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होई.यज्ञयागाचा हा साधेपणा लवकरच नाहींसा झाला.

मंत्र आणि ब्राह्मणग्रंथांच्या कालांत मात्र तें अत्यंत क्लिष्ट होऊन त्या मर्यादांपलीकडे गेले. तसेच निसर्गघटनांवरुन कल्पिलेल्या जुन्या देवतांच्या जोडीने कित्येक कृत्रिम देवतांचीहि आराधना यज्ञांत केली जाऊ लागली.उदाहरणार्थ यज्ञात वापरले जाणारे मृत्तिकापात्र एकाद्या सर्वशक्तिमान देवतेप्रमाणें स्तुतिस्तोत्रांचा विषय बनले.तसेच अनेक दुय्यम वस्तूंना विनाकारण महत्व आले.उदाहरणार्थ यज्ञस्तंभाची पूजा करणे, काव्य करणे.

[10]ब्राह्मण हे मुळात पुरोहित होते.त्यांचाच वर्ण बनला.नंतर त्यांची जात बनली.

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

परिणामी आहुति अर्पण करण्यामागील भावनाच बदलली.एकाद्या देवतेला शांत करणें किंवा एकाद्या देवतेशीं तादात्म होणे, या भावनेऐवजी यज्ञामार्फत यज्ञकर्त्याला इष्ट ते देण्याची देवतांवर जणू सक्तीच झाली. यज्ञकर्ता स्वत:ला इष्ट तें करण्यास देवतांना भाग पाडूं शकतो इतकेच नव्हे तर, संबंधित देवता या माणसाने अर्पण केलेल्या आहुतींमुळेंच देवता बनतात आणि त्यांच्या ठिकाणीं विश्वव्यवस्थेचे रक्षण करण्याची शक्ति येते, अशी कल्पना केली जाऊ लागली.वेगळया शब्दांत सांगावयाचें तर, देवतांपेक्षा यज्ञाला श्रेष्ठ स्थान दिले गेले. या भूमिकेतूनच यागविधींमध्ये मंत्रविद्येचा, म्हणजे जादुटोण्यांचा प्रवेश झाला.



## देव - ब्राह्मणांचे वर्चस्व

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञयाग केले जात होते.यज्ञ करणारा पुरोहित वर्ग निर्माण झाला. हा पुरोहित वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्णाचे व जातीचे लोक होय. ब्राह्मणग्रंथांचे सूक्ष्म व तपशीलवार ज्ञान असणाऱ्यांना ब्राह्मण म्हणावे असे ब्राह्मणग्रंथांतच म्हंटले आहे.या ब्राह्मणांनाच नंतर 'देव' मानले गेले.शतपथ ब्राह्मणग्रंथांनुसार देवांचे दोन प्रकार आहेत.पहिले स्वर्गातील देव आणि दुसरे हे मानवलोकातील ब्राह्मण देव ! यज्ञात देवांना अर्पण करण्यात येते तिला *'आहुति'* म्हणतात तर ब्राह्मणांना देण्यात येते तिला *' दक्षिणा '* म्हंटले जाते.दोघांना संतुष्ट केल्यानंतरच यजमानाला योग्य ते फळ मिळते.

यज्ञामुळे या ब्राह्मणांचे वर्चस्व इतके वाढले की ते मनुष्य जातीतील जणू देवच झाले.परिणामी त्यांना इतरांपेक्षा काही जास्त विशेषाधिकार मिळाले. त्यामुळे त्यांना संतुष्ट ठेवणे, त्यांच्या विरोधात काहीही न बोलणे हाच नियम झाला.अनेकदा ते देवांपेक्षाही महत्वाचे ठरले.पुढे तर देवांनाही त्यांची दहशत वाटू लागली ! या पुरोहितांनी यज्ञविधी, सारी यज्ञसंस्थाच कर्मकांडात बंदिस्त केली. यज्ञसंस्था कठोर, निर्घृण व जुलमी बनवली. सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली. हळूहळू ती जडशीळ, कृत्रिम व निष्प्राण बनली. दुसरे म्हणजे यज्ञात देवदेवतांना दिली जाणारी आहुति मुख्यत: पशुंची होती. यज्ञातील पशुबळी प्रथेमुळे प्राणी हिंसा वाढली.यज्ञासाठी वनस्पती, जंगलतोड वाढली.यज्ञाचा वास्तविक अर्थ व उपयुक्तता, त्याचप्रमाणे त्यांचे इष्ट फळ देण्याचें सामर्थ्य विसरले गेले.या हिसेच्या विरोधातूनच अहिंसेचा पुरस्कार करणारे बौध्द व जैन धर्म जन्माला आले.

यज्ञसंस्थेस आणि यागविधीच्या विरोधातून उपनिषदांचे चिंतन व आविष्करण झाले.यज्ञयागाची पराकोटी इतकी झाली की तिच्यामुळे विद्यमान वर्णजातिव्यवस्थेला नैतिक आधार मिळाला.यज्ञाचा आध्यात्मिक अर्थ लावण्याच्या प्रवृत्तीपायी हे घडले.

## उपनिषदांमधील मुख्य सिध्दान्त

अ) ब्रह्म, आत्मा, परा आणि अपराविद्या (मुंडकोपनिषद आणि इशोपनिषद)
ब) नैतिक विचार (इशोपनिषद)

उपनिषदांमध्ये अनेक विषय मांडलेले आहेत.तथापि उपनिषदांमधील मुख्य सिध्दान्त दोन आहेत.

1) ब्रह्म
2) आत्मा
3) आणि त्याची एकात्मता = ब्रह्मात्मैक्य.

या सिध्दान्तांना अनुसरून आपण मुंडकोपनिषद आणि इशोपनिषद यात मांडलेल्या परा आणि अपराविद्या या संकल्पना आणि इशोपनिषदातील नैतिक विचार यांचा अभ्यास आपण करणार आहोत.हे उपनिषदांचे प्रमुख सत्ताशास्त्रीय सिध्दान्त आहेत. परा आणि अपराविद्या या दोन संकल्पना ज्ञानशास्त्रीय आहेत.याचा अर्थ उपनिषदांमधील सत्ताशास्त्रीय सिध्दान्त आणि ज्ञानशास्त्रीय सिध्दान्त परस्परांशी निगडीतच नव्हे तर परस्परावलंबी आहेत. या साऱ्यांचे विवेचन पुढीलप्रमाणे :



## अ) ब्रह्म आणि आत्मा

उपनिषदांमध्ये सर्वात स्पष्ट आणि सविस्तर प्रतिपादिलेला सिध्दान्त एकत्ववादी आणि चिद्वादी (idealistic) आहे असें म्हणतां येईल.'येथें नानात्व नाहीं', *(नह नानास्ति किंचन')* हें सर्व ब्रह्मच आहे' *('सर्व खल्विदं ब्रह्म )* यांसारखी, वाक्यें उपनिषदांमध्ये जागोजाग आढळतात. या एकत्ववादी सिध्दान्ताला *'चिद्वादी'* असें विशेषण लावतां येईल.ब्रह्म आणि आत्मा या दोन चैतन्यमय तत्त्वांचे विवेचन असल्याने त्यास चिद्वाद म्हंटले आहे.

'ब्रह्म आणि आत्मा' या उपनिषदांमधील प्रमुख संकल्पना आहेत. 'या दोन खांबांवर जवळ जवळ सर्व भारतीय तत्वज्ञानाची इमारत उभारलेली आहे'.असें त्यांचे वर्णन केले जाते.त्यामुळे दोन पदांचा खुलासा केला पाहिजे.

'ब्रह्म' हा शब्द 'बृहन्' म्हणजे वाढणें, एकाएकीं प्रकट होणें, या धातूपासून आला आहे.फार प्रारंभी, त्याचा अर्थ *'प्रार्थना'* असा होता असें दिसते.प्रार्थना या स्वरुपांतील ब्रह्म म्हणजे जे ऐकण्यास पात्र आहे आणि नुसत्या उच्चारणद्वारा व्यक्त होतें ते होय.त्यामुळे केवळ उच्चारणरुपानेच नव्हे तर, अखिल सृष्टीच्या रुपाने एकाएकी प्रकट होतें ते *'विश्वाचें आदिकारण'* हा त्या शब्दाचा उपनिषदांतील तत्वज्ञानात्मक अर्थ असावा.

'आत्मा' या दुस-या पदाचें अर्थविवरण अधिकच अनिश्चित आहे.'आत्मा' या पदाचा मूळ अर्थ बहुधा 'श्वास किंवा प्राण' असा असावा.कालांतराने तो शब्द मानवाचा *'मी-पणा'* याला उद्देशून वापरला जावू लागला. याप्रमाणें, या दोन पदांपैकीं प्रत्येकाला स्वतंत्र अर्थ आहे.

'बाह्य जगताचे अंतिम कारण' हा ब्रह्म या शब्दाचा विशेष अर्थ आहे, तर 'मानवाचा अंतर्गत जीवात्मा' हा आत्मा या शब्दाचा विशेष अर्थ आहे.विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी की या पदांचे मूळ अर्थ अत्यंत भिन्न असले तरी त्यांचा समानार्थी उपयोग अधिकाधिक रुढ होवू लागला. या दोन्ही शब्दांनी मुख्यत: ***'विश्वाचे शाश्वत कारण, म्हणजे सृष्टीचे व मानवाचेही शाश्वत कारण',*** असा अर्थ व्यक्त होवू लागला.परिणामी या दोन पदांना एकच अर्थ दिला गेला.

याचा अर्थ असा कीं, भारतीय तत्वज्ञांनी आपल्या तत्वचिंतनात बाह्य सत्ता आणि मानवाची अंत:स्थ सत्ता यांचे तादात्म्य मानले आणि अशा तादात्म्यीकरणामुळेच अखेरीस त्यांना एकत्वाचा शोध लागला.हे एकत्व आधीच्या कर्मकांडात गुंतलेल्या अनेक देवतावादापेक्षा अधिक प्रगत आणि ख-या अर्थानें तत्वज्ञानात्मक होते.हे तादात्म्यीकरण कसें घडून आले आणि त्याचा समग्र अभिप्राय कोणता यांविषयी थोडा सविस्तर विचार करणें अवश्य आहे.

'आत्मा' या शब्दाचा अर्थ, कालांतरानें 'जीवात्मा' असा केला गेला. ज्या शरीराकृतीशी व्यक्तीचा संबंध आहे तिच्याहून भिन्न असा व्यक्तित्वाचा सारभूत महत्वाचा घटक कोणता ? याचा जो शोध घेतला गेला त्यामुळें आत्मा या शब्दाला 'जीवात्मा' हा अर्थ प्राप्त झाला. येथें एक गूढतर, मानसिक स्वरुपाचें तत्व हा

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

अखेरीस मानवाचा सारभूत महत्वाचा घटक मानला गेला.[11] उत्तरकालीन मंत्र आणि ब्राह्मणग्रंथ यांच्या काळापासून जीव आणि जगत् यांमधील समांतर साम्याचा शोध घेण्याची, आणि एकाच्या विशेष लक्षणाला अनुरुप असें दुस-याचे लक्षण शोधण्याची प्रवृत्ति होती.[12] वेदकालाच्या उत्तरार्धातहि, जीव आणि जगत् यांमधील समान्तर-साम्याची कल्पना सर्वत्र आढळते.तीच उपनिषदांमध्येहि आहे.सर्व सृष्टि ही एक विश्वव्यापी व्यक्ति आहे असें मानण्याच्या प्रघाताचा स्वाभाविकपणे आत्म्याच्या कल्पनेवर परिणाम झाला, आणि जे केवळ एक मानसिक तत्व होतें त्याचे रुपांतर एका जगत् तत्वामध्ये झालें.म्हणजे व्यक्तिगत आत्मा ('जीवात्मा') एकदमच 'विश्वात्मा'बनला व जगताचें गूढतम सत्य ठरला. एकदां विश्वविषयींची अशी कल्पना मान्य झाल्यानंतर, विश्वाचा आत्मा हाच एकमेव आत्मा ठरला, आणि इतर आत्मे, कोणत्या रीतींने, त्या आत्म्याशीं एकरुप मानले गेले. ही विचारसरणी अंतर्निरीक्षणावर अवलंबून होती.

अर्थात या प्रक्रियेने आत्म्याचे एकत्व सिध्द झालें तरी, त्यावरुन अखिल सत्तेचे एकत्व सिध्द होत नाहीं; कारण, व्यक्तीक्च्या बाबतीत आत्मा हा देहादि घटकांहून भिन्न मानतां येतो तसा जगदात्माहि त्याच्या भौतिक आवरणाहून, म्हणजे जड विश्वाहून, भिन्न मानावा लागतो. ते कसे शक्य आहे ?

आतापर्यन्तच्या विचारप्रक्रियेला पूरक अशी दुसरी एक विचारप्रक्रिया याच काळांत चालू झाली होती.त्या प्रक्रियेनें बह्म सर्व दृश्य जगाचें एकमेव आदिकारण मानलें गेलें होतें. ही विचारसरणी वस्तुगत विचार-पध्दतीवर आधारलेली होती.या विचारसरणीमध्ये बाह्य जगताच्या विश्लेषणापासून प्रारंभ केलेला होता. भारतीय तत्वचिन्तनाच्या सामान्य प्रवृत्तीला अनुसरुन येथेहि विश्वकारणाविषयी अनेक कल्पना केल्या गेल्या.विश्वाचा अधिकाधिक समाधानकारक खुलासा करणा-या या कल्पनामालिकेंमधील ब्रह्म ही अखेरची कल्पना आहे.वैदिक तत्वज्ञानाच्या विकासाच्या कोणत्यातरी एका अवस्थेंत ब्रह्म हे विश्वाचे आदिकारण विश्वाच्या गूढतम सारभूत महत्वाच्या घटकांशी, म्हणजे विश्वाच्या आत्म्याशीं, एकरुप मानलें गेलें.

## निरुपाधिकतत्व

अशा रीतीनें, मानवाच्या यथार्थ स्वरुपाविषयीच्या जिज्ञासेंतून निर्माण झालेला हा दुसरा विचारप्रवाह आणि पहिला विचारप्रवाह असे दोन स्वतंत्र विचारप्रवाह एकत्र आले, आणि या एकत्रीकरणाने ज्याचा प्रदीर्घ काळपर्यन्त शोध चालला होता ते एकत्व सापडलें. जे भौतिक जग आत्मसिध्दान्तानुसार केवळ अनात्मस्वरुप मानलें होतें तें आतां आत्म्याचेंच एक रुप ठरलें.अशा दोन, बाह्यत: भिन्न, परंतु अंतर्गतदृष्ट्या सदृश, विचारांचे एकत्रीकरण हा उपनिषदांच्या प्रतिपादनांतील प्रमुख सिध्दान्त असून, 'तूं तें आहेस', 'मी ब्रह्म आहे' यांसारख्या महावाक्यांत, किंवा ब्रम्ह = आत्मा या समीकरणानें, तो व्यक्त केलेला आहे.जगत् आणि व्यक्ति या एकाच अंतिम सत्तेचा आविष्कार असल्यानें, दोन्ही मूलत: एकच होत .वेगळया शब्दांत सांगावयाचें तर, निसर्ग आणि मानव विभक्त नाहींत तसे, यांपैकी कोणीही ईश्वरापासून विभक्त नाहीं.

अशा संश्लेषणानें, अंतिम तत्व एक आहे असा निष्कर्ष मिळतो.त्याचप्रमाणे त्यात आणखीही एक महत्वाचा अभिप्राय आहे. तो असा की ब्रह्म कल्पना वस्तुनिष्ठ असल्याने ती एका गृहीत मानलेल्या वस्तूची

---

[11]येथे व्यक्तिनिष्ठ विचार-पध्दतीचा उपयोग केला गेला, आणि अन्तर्निरीक्षणानें वरील अर्थाचा निष्कर्ष काढला गेला. देह, प्राण, इत्यादींना व्यक्ति मानण्याची चूक झाली. पण अशी चूक होणे सहज शक्य असते.

[12]या प्रयत्नांमध्ये, मानवी व्यक्तिमत्वाच्या परिभाषेंत जगताच्या स्वरुपाचें वर्णन करण्याचा प्रयत्न दिसून येतो. ज्ञात विशिष्टावरुन अज्ञात विश्वव्यापक सामान्याचें ज्ञान करुन घेण्याचा असा यत्न पुरुषसूक्तासारख्या रचनेंत दिसतो. या सूक्तामध्यें विश्वाचें विभाग हें पुरुषाचें, म्हणजे एकाद्या प्रचंड मानवी व्यक्तीचे, अवयव होत असें वर्णन केलेलें आहे. एका और्ध्वदेहिक सूक्तांत मृताला उद्देशून म्हटलें आहे 'तुझा नेत्र सूर्याकडे जावो, तुझा प्राण वायूकडे' इत्यादि येथेंहि तोच यत्न स्पष्टपणें दिसतो. याखेरीज, जीवनावश्यक श्वास या अर्थाने 'प्राण' या व्यक्तीच्या एका महत्वाच्या घटकांचें सामान्यीकरण करुन, विश्वव्यापी प्राण या अर्थानें, तो अखिल जगताचा जीवनावश्यक घटक मानण्यांतहि असाच यत्न दिसतो.



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

कल्पना ठरते, त्यामुळे या कल्पनेत त्या वस्तूची (ब्रह्म) सिध्दता केलीच पाहिजे, असे अपरिहार्यरित्या ठरत नाहीं. याच कारणास्तव ती अचिद्रूप असावी असें मानलें जाण्याचा संभव आहे.असे दोन दोष दिसतात.

उलटपक्षी आत्म्याच्या कल्पनेत हे दोन्ही दोष नाहीत.परंतु, 'आत्मा' या शब्दाचा सामान्यत: *जीवात्मा* असा अर्थ केला की ती आत्म्याची कल्पना मर्यादित बनते आणि मग तिला समग्र अंतिम सत्ता (विश्वात्मा ) हा अर्थ येवू शकत नाही. *'विश्वाचा आत्मा'* असा आत्मा या शब्दाचा अर्थ घेतला तरी भौतिक जग हे त्याहून भिन्न असल्यानें, त्याला भौतिक जगाची मर्यादा पडते.



तथापि जेव्हा आत्मा आणि ब्रह्म या दोन कल्पनांचे एकत्रीकरण होतें, तेव्हां त्यातून, विरोध-विकास-प्रक्रियेनें, जिच्यामध्यें या दोन्ही कल्पनांमधील दोष नाहींत अशी तिसरी निर्दोष कल्पना निष्पन्न होते. ती आत्म्याप्रमाणे चिद्रूप आहे; परंतु आत्मा मर्यादित आहे तर ती (ब्रह्म) कल्पना अनन्त आहे. हे अंतिम तत्व आपल्या आत्म्याशीं एकरुप मानल्याबरोबर त्या कल्पनेला पूर्ण निश्चितता प्राप्त होते.आपल्या आत्म्याचे नेमकें स्वरुप आपणांस कितीहि अज्ञात असलें तरी, साक्षात-प्रचितीमुळे, आपणांस आपल्या स्वत:च्या अस्तित्वाची सत्यता मान्य करावीच लागते.

या श्रेष्ठतर सत्तेचें वर्णन *'सत्यम, ज्ञानम, अनन्तम'* या शब्दांनीं केलेलें आहे.यापैकीं 'सत्यम' हे पद सत्तेची साक्षात् निश्चितता दर्शवितें, 'ज्ञानम' हें पद त्या सत्तेचें चित्स्वरुप दर्शविते, आणि 'अनंतम' हें पद त्या सत्येची सर्वव्यापकता दर्शवितें.हें उपनिषदांचें निरुपाधिकतत्व होय. एका अर्थाने, तें ब्रह्म नाही आणि आत्माहि नाहीं; परंतु दुस-या अर्थाने तें दोन्ही आहे.मानवी आत्म्यामध्यें त्याचा पूर्णत्वानें आविष्कार होत नसला तरी, बाह्य जगतापेक्षां अधिक चांगल्या प्रकारे होतो. बाह्य जगतामध्ये तें तत्व केवळ जडद्रव्य या रुपानें व्यक्त होत असल्यानें, तेथें त्याच्या स्वरुपाचा फार मोठा भाग अव्यक्त राहतो.

निरुपाधिक तत्त्व सिध्दान्ताचें प्रतिपादन ही भारतीय तत्वज्ञानाच्या समग्र इतिहासामधील सर्वात महत्वाची प्रगति म्हटली पाहिजे.या सिध्दान्ताच्या प्रतिपादनानें तत्वज्ञानाच्या भूमिकेमध्यें जणु एक क्रान्ति घडून आली.दोन विचारसरणीच्या एकत्वाने ब्रह्मवस्तुचेही एकत्व पावले.या परिवर्तनाचें स्वरुप पुढील दृष्टान्तानें लक्षांत येईल. अशी कल्पना करा की, कांहीं लोकांना शुक्र तारा पूर्वेला दिसतो एवढेच माहीत आहे, तर इतरांना तो पश्चिमेला दिसतो इतकेंच माहीत आहे. यांपैकीं प्रत्येक गटाला असें वाटतें की, आपल्याला जो तारा दिसतो तो इतरांना दिसणा-या ता-यातून वेगळा आहे.अशा स्थितीत, जर एकाद्याला असा शोध लागला की, दोन्ही वस्तुत: एकच आहेत. जो पूर्वेचा तारा आहे तोच पश्चिमेचा तारा आहे, तर शुक्र ता-याविषयींच्या दृष्टिकोनांत ज्या प्रकारचें परिवर्तन होईल, तसेंच परिवर्तन प्रस्तुत प्रश्नाच्या बाबतीत झालें.भारतामध्ये ख-या एकत्वाची कल्पना केवळ याच अवस्थेत प्राप्त झाली.

## उपनिषदांची आत्ममीमांसा

## आत्मा आणि ब्रह्म यांचा संबंध : 'जीवा' चे स्वरुप आणि अवस्था

भारतीय तत्वज्ञानाच्या संदर्भात मानसशास्त्र (psychology) शब्द आत्म्याचें शास्त्र किंवा आत्म-सिध्दांत या अर्थाने वापरला जातो.त्यांतील प्रतिपादन 'आत्मा अस्तित्वांत आहे' या गृहीत विधानांवर आधारलेले आहे. उपनिषदांच्या ऋषींची अशी भूमिका आहे कीं, आत्म्याचें अस्तित्व हें सर्व अनुभवाचें गृहीतक आहे. ते सर्व सिध्दतेच्या प्रक्रियांचा आधार असल्यानें, त्याच्या सिध्दतेची आवश्यकता नाहीं.'ज्याच्या सहाय्यानें हे सर्व जाणलें जाते ते कशाच्या सहाय्यानें जाणणें शक्य आहे ? कोणत्या साधनानें ज्ञात्याचें ज्ञान होणें शक्य आहे ? ते शक्य

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

नाही.ते गृहीतच धरावे लागते.या कारणास्तव, उपनिषदें प्रत्यक्षत: आत्म्याच्या अस्तित्वाची सिध्दता देण्याचा प्रयत्न करीत नाहींत.

तथापि, त्यामध्यें अनेक सूचक विधानें केलेली आहेत.उदाहरणार्थ, आत्मा किंवा जीव याला *'पुरुष'* म्हटलें असून, 'पुरुष' या शब्दाची व्युत्पत्ति *पुरि-शय, 'जो देहाच्या दुर्गामध्यें राहतो तो',* अशी दिली आहे.याचा अर्थ असा कीं, देह आणि सहकार्याने क्रिया करणारे त्याचे विविध अवयव यांच्या अस्तित्वावरुन, ज्याचा हेतू त्यांमुळें पूर्ण होतो अशा कांही वस्तूचें अनुमान करतां येतें.ज्याच्यावाचून देहयंत्रणा निरर्थक ठरेल अशी ती वस्तु म्हणजे आत्मा होय.



कर्मसिध्दांतावर आधारलेलें दुसरें एक सूचक विधान कांही ठिकाणीं आढळतें. उदाहरणार्थ एका आयुष्याच्या मर्यादित कालावधीमध्ये आपल्या सर्व कृत्यांची फळें भोगणें आपणांस शक्य नाही.जोपर्यंत आपला विचार वर्तमान आयुष्यापुरताच मर्यादित आहे तोपर्यंत, आपणांस जें शुभाशुभ भोगावें लागतें त्याचा पूर्ण खुलासा करतां येत नाहीं.जीवनाविषयीच्या सर्व निरीक्षित घटनांचा खुलासा एका जन्माच्या आधारें करतां येत नाही. नैतिक फलप्राप्तीविषयीच्या सामान्य श्रध्देला योग्य आधार असेल तर, आत्म्यांचे पुनर्देहधारण मान्य करुनच आत्म्याच्या वर्तमान जीवनांतील ज्या गोष्टींचा खुलासा होत नाहीं त्यांचा खुलासा त्या आत्म्याच्या पूर्वजन्मींच्या कृत्यांच्या आधारे केला पाहिजे. आणि या जन्मांतील अन्यायकारक वाटणा-या गोष्टींची फेड नंतरच्या जन्मांत होणार आहे असें मानलें पाहिजे.

उपनिषदांतील निरुपाधिकतत्वाविषयींच्या दोन सिध्दांतामध्यें आत्मा आणि अंतिम तत्व, किंवा जीव आणि ब्रम्ह यांच्या संबंधाविषयीं कांहीसें भिन्न प्रतिपादन आहे. अंतिम तत्वाच्या विश्वव्यापी स्वरुपाच्या कल्पनेनुसार, जीव हा, तात्पुरता का होईना, ब्रह्माचा एक वास्तव परिणाम असल्यानें, या दृष्टीने जीव ब्रह्माशी एकरुपहि आहे आणि ब्रह्माहून भिन्नहि आहे. हे ब्रह्मच जीवरुपानें भासतें.तेव्हां, आपण जीव म्हणून या ब्रह्माहून भिन्न आहोत.

तथापि जीव स्वत:ला मर्यादित समजत असला तरी खरोखर तो तसा नाही. तेथे स्व-अतीत अवस्थेचा अद्वितीय अनुभव, बोधन (मनोमय) आणि आत्मबोधन (विज्ञानमय) यांहून, श्रेष्ठ पातळीचा मानला आहे; कारण, अशा अवस्थेमध्यें कनिष्ठ पातळीवरील संघर्ष आणि संभ्रम यांचा निरास झालेला असतो. शांति हें या अवस्थेंचे सारभूत अक्षण आहे हें दाखविण्यासाठीं या अवस्थेला *'आनंदमय'* असें नांव दिलें आहे.

जीव हा शब्द 'जीव्' म्हणजे श्वासोश्वास करणें, या धातूपासून आला आहे, 'जीव' या नांवामुळें, जीवनव्यापारांपैकीं श्वसनासारख्या, गाढ झोपेमध्यें मन निष्क्रिय असतांनाहि चालूं रहाणा-या, जैव किंवा अबोध क्रिया या एका प्रकारच्या क्रियांचा प्रामुख्याने निर्देश होतो.उपनिषदांनी 'भोक्ता', म्हणजे अनुभव घेणारा, आणि 'कर्ता' अशीं, जीव या अर्थाचींच, आणखी दोन पदें वापरली आहेत.ही दोन्हीं पदें मिळून जीवनव्यापारांपैकीं मानसिक किंवा बोधात्मक क्रिया या दुस-या प्रकारच्या क्रियांचा प्रामुख्याने निर्देश होतो.अबोध क्रियांच्या तत्वाला 'प्राण' आणि बोधयुक्त क्रियांच्या तत्वाला 'मनस्' अशीं नांवें दिलेलीं आहेत.हीं दोन तत्वें म्हणजे आत्म्याच्या ऐहिक जीवनांतील उपाधि होत.

या दोन उपाधी बरोबरच जड शरीर ही आत्म्याची *तिसरी एक उपाधि* आहे.फक्त ही तिसरी उपाधि, म्हणजे शरीर, प्रत्येक जन्मांत भिन्न असते.तेंव्हा (1)शरीर (2)प्राण आणि (3) मनस् या तीन उपाधि मिळून आत्म्याचें जणुं 'इहलोकींचे निवासस्थान' बनलेलें असतें.आत्म्याच्या बोधयुक्त क्रिया या, मनानें दहा इंद्रियांच्या सहाय्यानें केलेल्या क्रिया होत.पहाणें, ऐकणें, स्पर्श करणें, वास घेणें आणि चव घेणें ही अनुक्रमे चक्षुसृ, श्रोत्र, त्वक, प्राण आणि रसना या पांच कर्मेंद्रियांनी होणारी कर्में होत.

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

या सर्वांमागील मन एकच असतें हें उपनिषदांनीं स्पष्टपणें प्रतिपादन केकलें आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें अनेक मानसिक शक्तींची एक यादी दिलेली असून, शेवटीं असें म्हटलें आहे की, 'या सर्वांचा मनामध्येंच समावेश आहे'.त्याचीं कार्ये कितीहि भिन्न प्रकारची असलीं तरी, बोधाचें केंद्रस्थानी असलेलें इंद्रिय या दृष्टिनें मन एकच आहे.तें ज्ञानेंद्रियांचे आणि कर्मेंद्रियांचें नियंत्रण करतें.तें ज्ञानेंद्रियाच्या द्वारा बाहय वस्तूंकडून येणा-या संस्कारांचा समन्वय करतें, आणि, अवश्य तेव्हां, पांच कर्मेंद्रियांपैकी एकाद्या इंद्रियाच्या सहाय्यानें कांहीं क्रिया करण्याचा संकल्प करतें. या दोन इंद्रियसमूहांशी मनाचा जो संबंध आहे त्याची तुलना संवेदन आणि कृति करणा-या मज्जातंतूंशी मेंदूचा जो संबंध आहे त्याच्याशी केली गेली आहे.

15

## परा विद्या आणि अपरा विद्या

मुण्डकोपनिषदांत श्रेष्ठ ज्ञान (परा विद्या ) आणि कनिष्ठ ज्ञान (अपरा विद्या ) असे ज्ञानाचे दोन प्रकार मानलें आहेत.परा विद्या म्हणजे ब्रह्मज्ञान आणि अपरा विद्या म्हणजे अनुभवविषयांचे = जगताचे ज्ञान. ब्रह्याचे ज्ञान होणे याचा अर्थ सर्व वस्तुजाताच्या आधारभूत तत्वाचे मर्मदर्शन घडणे.या अर्थाने त्याला पूर्ण ज्ञान म्हंटले जाते.

आाणि याच दृष्टिने ते कनिष्ठ ज्ञानाहून भिन्न आहे.कनिष्ठ ज्ञान कितीहि झालें तरी, तुटपुंजेच ठरते, या दोन प्रकारच्या ज्ञानांमध्यें विरोध नाही.अर्थात, हे ब्रह्माच्या विश्वव्यापी स्वरुपाच्या कल्पनेनुसार दिलेले विवरण होय.

उपनिषदांमध्यें दुस-या एका दृष्टिकोनाचें तितक्याच स्प्टपणें प्रतिपादन केलेलें आढळतें. या दृष्टिकोनानुसार, ब्रह्मतत्व सर्व ज्ञान-घटकांच्या पलीकडचें असल्यानें, तें जाणतां येत नाहीं.' विचार आणि वाचा, ते न सापडल्यानें, त्यापासून मागे फिरतात' असा दृष्टिकोन उपनिषदात मांडला गेला आहे. म्हणजे ब्रह्म अज्ञेय आहे! ब्रह्याच्या स्वरुपाचे हे अज्ञेयत्व उपनिषदांनी वेगवेगळया रीतींनीं दाखविलें आहे. उदाहरणार्थ, ईशोपनिषदामध्यें ब्रह्याला परस्परव्याघाती विशेषणे लावली आहेत : *'ते चल आहे, ते अचल आहे. ते दूरस्थ आहे, ते समीपस्थ आहे.ते या सर्वांच्या आंत आहे आणि या सर्वांच्या बाहेरहि आहे'.*

शंकराचार्यांनी 'वेदान्तसूत्रा' वरील भाष्यांत ज्याचा उल्लेख केला आहे, ( परंतु जे आतां उपलब्ध नाही ) अशा एका उपनिषदांमध्ये या ब्रह्मतत्व सर्वोत्कृष्ट उदाहरण दिले. बाष्कली नामक शिष्य ब्रह्मतत्वाचे विशद करण्याविषयी बाध्व या गुरुला विनंती केली; बाध्व त्याला मौनानेंच उत्तर देतो अशी कथा आहे.बाष्कलीनें प्रार्थना केली: 'भगवन् मला ज्ञान द्यावे.बाध्व स्तब्ध राहिला.जेव्हा दुस-यांदा आणि तिस-यांदा तीच विनंती केली गेली, तेव्हां बाध्व उत्तरला :

''मी ज्ञान देत आहे, परंतु तुला त्याचे ग्रहण करतां येत नाही.आत्मा नि:शब्द आहे. *उपशान्तोयमात्मा ।'* या अर्थ ब्रह्मज्ञान होतच नाही तर ही भूमिका अज्ञेयवादी (agnostic) ठरत नाहीं काय ? याचें उत्तर असे की '' जरी आपण ब्रम्ह जाणू शकत नसलो तरी, आपण ब्रह्म होवू शकतो. *'जो ब्रह्म 'जाणतो' तो ब्रह्मच होतो'.* अशा परमोत्कर्षाचें जें साधन त्याला *'विद्या'* म्हणतात.

## ब्रह्म, आत्मा,कर्म

या उपनिषदातील मूलभूत सिध्दान्त हे 'ब्रह्मन्' व 'आत्मन्' या दोन कल्पनांभोवती केंद्रीत झालेले आहेत, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाही.यांपैकी 'ब्रह्मन्' या पदाने विश्वापाठीमागील सत्य दर्शविलें आहे; व 'आत्मन्' या पदाने मानवांतील 'सत्य' अभिप्रेत आहे. उपनिषदांतील विचारवंत बाह्य विशाल सृष्टि जशी मानतात, तशीच या बाह्य विश्वाप्रमाणेच त्यांच्याशी सुसंवादी अशी मानवांतील अंतर्यामीची सृष्टिही मानतात.

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

त्यांचा प्रयत्न सतत या दोन्ही विश्वांतील 'सत्य' शोधून त्यांचा परस्परसंबंध काय आहे हें पाहण्याकडे आहे.या त्यांच्या अभ्यासाच्या दोन दिशा आहेत. '' विश्व हे ब्रह्ममधून निर्माण झालें आहे, त्यामुळेच स्थिरावले आहे व अंतीं त्यामध्येच विलीन व्हावयाचें आहे. अतएव विश्व हे ब्रह्मच आहे.'' असा त्यांचा निष्कर्ष आहे.

हाच अर्थ 'सर्व खलू इदं ब्रह्म या व अशासारख्या महावाक्यांनी सांगितलेला आहे.मानव व विश्वामध्ये अंतिम सत्य 'आत्मन्' आहे व देहाचा विनाश झाला तरी 'आत्मन्' अमर,अविनाशी, विक्रियांच्या पलीकडे असा आहे. हा 'आत्मा' आनंदस्वरुप आहे. 'तत्सत्यं स आत्मा', 'एष स आत्मा' यांसारख्या वचनांत हा निष्कर्ष सांगितलेला आहे.आत्मा व ब्रह्म ही दोन्ही एकच आहेत, हा उपनिषदांचा सर्वांत महत्वाचा आणि मौलिक असा सिध्दान्त आहे.

हा निष्कर्ष *'अहं ब्रह्मासि', 'तत्वमसि'* अशांसारख्या महावाक्यांतून व्यक्त होतो.मानव व विश्व यांमध्ये एकच चैतन्ययुक्त आनंदस्वरुप अविनाशी असें तत्व आहे.बाकी सारे भौतिक असून विनाशी आहे व त्याचें तादृश महत्वहि नाही. हें आनंद-स्वरुप वा सच्चिदानंदस्वरुप ब्रह्म जाणून तद्रूप होणें, आपले त्याच्याशी असलेलें नैसर्गिक तादात्म्य पुन: ज्ञानाने, साक्षात्काराने प्रस्थापित करणें हेंच मानवी जीविताचे ध्येय आहे.हाच मोक्ष आहे. आरुणि, श्वेतकेतु, याज्ञवल्क्य, मैत्रेयी यांच्या संवादांतून या कल्पनांचे सिध्दान्त असून त्यांचें विवेचन आपणांस उपनिषदांमध्ये वारंवार आढळतें.

थोडक्यात विश्वांतील 'सत्य' शोधीत असतांना पंचमहाभूतें, इंद्र-सूर्य-चंद्रादि देवता सा-यांचा विचार होउन या सर्वांना प्राणप्रद व त्यांचें शासन, नियमन करणारें तत्व म्हणून 'ब्रह्म ' या संकल्पनेवर उपनिषदांचा विचार स्थिरावला.त्याचप्रमाणे मानवामध्ये 'सत्य' काय आहे हे शोधीत असतांना देह, इंद्रियें या सर्वांचा विचार करुन ते प्राण म्हणजेच 'आत्मा' या कल्पनेवर स्थिरावले. आणि शेवटी ते दोन्ही भिन्न नसून एकच आहेत, असा निष्कर्ष मान्य झाला.

उपनिषदांचा आणखी एक महत्वाचा सिध्दान्त म्हणजे कर्मसिध्दान्त होय़ मानवांचें 'कर्म' हें अतिशय महत्वाचें असून मरणोत्तर मुक्ति वा जीवन, सद्गीत वा दुर्गति हें सारें 'कर्मा' ने ठरत असतें.'कर्म' अंशत: भोगाने व अंशत: ज्ञानाने नाहीसें करणें हाच श्रेष्ठ पुरुषार्थ होय़ हाच मोक्ष होय अशी विचारसरणी येथे आढळते.

## उपनिषदांचे महत्व

उपनिषद ग्रंथांमध्ये केवळ एकाच गुरुच्या विचारांचा नव्हे तर, अनेक गुरुंच्या विचारांचा समावेश झालेला आहे. त्यामुळें, त्यांत नव्या आणि जुन्या कल्पनांचें संमिश्रण झालेलें आहे.नंतरच्या एका काळीं, जेव्हां हिंदूंच्या प्राचीन विद्येचें संकलन आणि संपादन झालें तेव्हा, उपनिषद् ग्रंथ ब्राह्मणग्रंथांना जोडले गेले. याचा अर्थ असा की, या वाङमयाचें संकलन झाले तेव्हां दोन्ही उपनिषदे व ब्राह्मणग्रंथ यांना प्राचीन मानले गेले.याप्रमाणे, वेदवाङ्मयांत उपनिषदांना अखेरचें स्थान दिलेलें असल्यानें त्यांना 'वेदान्त', म्हणजे वेदांचा अखेरचा भाग असें म्हटलें गेले. ज्याप्रमाणें ॲरिस्टॉटलचा एक ग्रंथ त्यांच्यालेखसंग्रहामध्यें भौतिक शास्त्रावरील (physics) ग्रंथांनंतर आल्यामुळें त्याला अतिभौतिकशास्त्र (metaphysics) असें नांव मिळालें, तसाच प्रकार येथेहि झालेला दिसतो.

'अन्त' या संस्कृत शब्दाचे 'समाप्ति' आणि 'साध्य' किंवा 'फलश्रुति' असे दोन्ही अर्थ संभवतात.त्यामुळें प्रारंभी उपनिषदांचें वाङमयसंग्रहांतील स्थान दाखविणा-या 'वेदान्त' या शब्दाला, नंतर '*वेदांच्या उपदेशाची फलश्रुति* ' असा अर्थ प्राप्त झाला.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

उपनिषदें वाचीत असतांना कितीतरी प्राचीन विचारवंतांचा व आपला परिचय होतो.नीतितत्वें व सद्गुण यांचा विचार करणारे राथीतर, पौरुशिष्टि, नाक मौद्गल्य, शुष्कभृंगार, विश्वतत्वांचा विचार करणारे रैक्व, अश्वपति कैकेय, उद्दालक, स्वप्नांचा विचार करणारा सौरायणि गार्ग्य,त्याचप्रमाणे शांडिल्य, मधुविद्या सांगणारे दध्यच, सनत्कुमार, आरुणि, याश्रवल्क्य या अनेक तत्ववेत्यांची आपली भेट होते. या सा-यांनी आपापल्या चिंतनांनी उपनिषद्-विचारांत भर घातलेली आहे.त्यांमध्ये विविधता आणि संपन्नता आणली व त्याचा विकासहि घडविलेला आहे.



सारे उपनिषद्-वाङमय हें संस्कृत-वाङमयाचें व भारतीय तत्वज्ञानाचें एक अनुपम लेणें आहे, यात शंका नाही. सश्रध्दाला साक्षात्काराचा मार्ग दाखवून तो घडविण्याचें, संत्रस्ताला क्षणभर का होईना, शांति देण्याचें व अंधश्रध्दाला, अल्पकाळ का होईना, मोहून टाकण्याचें, भारण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायीं निश्चित आहे.

## उपनिषदे व ब्राह्मणग्रंथ : तुलना

उपनिषदांचा उदय म्हणजे ब्राह्मणग्रंथांतील विचारांची 'प्रतिक्रिया' आहे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे.ब्राह्मणग्रंथांत यज्ञ व कर्मकाण्डाचें प्राबल्य आहे, तर उपनिषदांत या दोहोंचे खंडनच आहे.यज्ञामुळे सर्व अमंगलाचा परिहार होऊन स्वर्ग व इच्छित फल लाभेल, अशी ब्राह्मणग्रंथाची मूलभूत श्रध्दा आहे; तर उपनिषदांना यज्ञ म्हणजे 'तळी छिद्र असलेल्या नौका' वाटतात. त्यांचा अंतिम नि:श्रेयसाच्या दृष्टीने फारसा उपयोग नाही असें त्यांना वाटतें. ब्राह्मणग्रंथांत अनेकदेवतावाद आहे, तर उपनिषदांत या अनेक देवतांचा जवळजवळ निरास करुन 'अद्वैत' प्रतिपादन करण्याकडे रोख आहे. ब्राह्मणग्रंथ 'कर्म' प्रधान आहेत, तर उपनिषदे 'ज्ञान' प्रधान आहे. ब्राह्मणग्रंथांत स्वर्ग हें अंतिम ध्येय आहे, तर उपनिषदांमध्ये 'अमरत्व, मोक्ष' हें अंतिम साध्य आहे.

सृष्टि-सौंदर्याने मुग्ध झालेल्या व सृष्टि-प्रभावाने भारलेल्या ऋग्वेदांतील 'कवी'चा ब्राह्मणग्रंथांत ा लोप झालेला दिसतो व 'पुरोहित' प्रभावी दिसतो, तर उपनिषदांत हा 'पुरोहित'हि मागे पडून 'तत्वचिंतक' प्रभावी दिसूं लागतो. ब्राह्मणग्रंथांत भौतिकांवर लक्ष अधिक केंद्रित आहे, तर उपनिषदांत वैराग्यावर भर असून पारमार्थिकावर लक्ष अधिक केंद्रित झालेलें दिसतें.ब्राह्मणग्रंथांत यज्ञ व यज्ञांतील बारीकसारीक तपशील आणि क्रिया यांचें विवेचन व त्यांचे अर्थ,इतिहास, यासंबंधींचें स्पष्टीकरण प्रामुख्याने आहे, तर उपनिषदांत जीवनांतील गहन प्रश्नांचा ऊहापोह आहे. असा हा संपूर्णपणे 'कायापालट'च झालेला आपणांस दिसतो.ब्राह्मणग्रंथांत 'यज्ञविद्या' आहे, तर उपनिषदांत 'ब्रह्मविद्या' आहे.

Department of Philosophy, Sangamner college, Sangamner